ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

नाशिक– ४२२ २२२

## वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा

## बी.कॉम. शिक्षणक्रम (G02) : माहितीपुस्तिका

**2018–2019**

# बी. कॉम. शिक्षणक्रम : माहितीपुस्तिका

## शिक्षणक्रम संकेतांक (Programme Code) : GO2

### *अनुक्रमणिका*


१. विद्याशाखेचा परिचय ..... ३

२. शिक्षणक्रमाविषयी ..... ३
- २.१ शिक्षणक्रमाची संरचना
- २.२ अध्ययनपद्धती
- २.३ कालावधी
- २.४ माध्यम
- २.५ श्रेयांक

३. प्रथम वर्ष बी.कॉम. ..... ४
- ३.१ अभ्यासक्रम
- ३.२ प्रवेश पात्रता
- ३.३ शिक्षणक्रम शुल्क
- ३.४ मूल्यमापन प्रक्रिया

४. द्वितीय वर्ष बी.कॉम.. ..... ६
- ४.१ अभ्यासक्रम
- ४.२ प्रवेश पात्रता
- ४.३ शिक्षणक्रम शुल्क

५. तृतीय वर्ष बी.कॉम. ..... ९
- ५.१ अभ्यासक्रम
- ५.२ प्रवेश पात्रता
- ५.३ शिक्षणक्रम शुल्क
- ५.४ मूल्यमापन प्रक्रिया (द्वितीय व तृतीय वर्ष)

६. सरळ प्रवेशाबाबत ..... ११
- ६.१ सरळ प्रवेश नियम
- ६.२ सरळ प्रवेश शुल्क

७. नोंदणी प्रक्रिया ..... ११

८. विभागीय केंद्रे ..... ११

९. विशेष सूचना/संपर्कासाठी ..... १२

## १. विद्याशाखेचा परिचय

मुक्त विद्यापीठाच्या स्थापनेपासून वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यशस्वीरित्या कार्यरत आहे. सध्या विद्याशाखेत पाच पदवी शिक्षणक्रम, पाच पदविका शिक्षणक्रम, दोन प्रमाणपत्र शिक्षणक्रम, दोन पदव्युत्तर शिक्षणक्रम राबविले जातात.

### उद्दिष्टे

१. सहकार, व्यापार–उद्योग, व्यवस्थापनशास्त्र, इत्यादी क्षेत्रांतील ज्ञानव्यवहाराची जाणकारी प्राप्त करून बहुश्रुतता वाढविणे.

२. कार्यालये, संस्था, कंपन्यांमध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करूनदेणे.

३. विद्यार्थ्यांना सातत्याने होणाऱ्या सुधारणा व बदलांतील एक सक्षम घटक बनविणे.

४. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकास गुण वृद्धिंगत करणे.

५. संशोधन कार्यातून वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र प्रगल्भ करणे.

६. शैक्षणिक शिक्षणक्रम व प्रसिद्धीच्या माध्यमातून ज्ञान सर्वदूर पसरविणे.

७. व्यवस्थापक होऊ पाहणाऱ्यांना ज्ञानार्जनाच्या नवीन संधी उपलब्ध करून देणे.

८. समृद्ध जीवन जगण्यासाठी ज्ञानात्मक आधार देणे.

## २. शिक्षणक्रमाविषयी

बी.कॉम. पदवी परीक्षेचा शिक्षणक्रम एकूण १०८ श्रेयांकांचा आहे. हा शिक्षणक्रम प्रत्येकी १०० गुणांच्या १८ अभ्यासक्रमांमध्ये विभागण्यात आला आहे. दरवर्षी ६ अभ्यासक्रम याप्रमाणे ३ वर्षांत एकूण १८ अभ्यासक्रम अभ्यासावयाचे आहेत.

### २.१ शिक्षणक्रमाची संरचना

बी. कॉम. पदवी शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमांची मांडणी पुढील तीन गटांत करण्यात आली आहे.

| *वर्ष* | *अभ्यासक्रम* | *श्रेयांक* |
|---|---|---|
| प्रथम | अधिष्ठान / सक्तीचे | ३६ |
| द्वितीय | ऐच्छिक / सक्तीचे | ३६ |
| तृतीय | वैकल्पिक / विशेषीकरण | ३६ |
| | **एकूण** | **१०८** |

या तीन वर्षांच्या पदवी शिक्षणक्रमात पहिल्या वर्षी ३६, दुसऱ्या वर्षी ३६ आणि तिसऱ्या वर्षी ३६ श्रेयांकांचे अभ्यासक्रम आहेत. सर्व अभ्यासक्रम पूर्ण करणे विद्यार्थ्यास बंधनकारक आहे.

**प्रथम वर्ष (सर्व अभ्यासक्रम सक्तीचे – प्रत्येकी ६ श्रेयांक)**

| *क्र.* | *अभ्यासक्रम* | *एकूण संपर्कसत्रे* |
|---|---|---|
| १. | (OPN 101) स्वयं–अध्ययन कौशल्यांचा अधिष्ठान अभ्यासक्रम | ०६ |
| २. | (MAR 102) मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम | ०९ |
| ३. | (HEN 101) हिंदी व इंग्रजी या भाषांचा अधिष्ठान अभ्यासक्रम | ०९ |
| ४. | (GKN 101) सामान्य ज्ञान व सामाजिक जाणिवांचा अधिष्ठान अभ्यासक्रम | ०९ |
| ५. | (COM 211) कार्यालयीन व्यवस्थापन | ०९ |
| ६. | (COM 106) वाणिज्यशास्त्र | १२ |

*(टीप : हिंदीसाठी ४ व इंग्रजीसाठी ५ संपर्कसत्रे आहेत.)*

**द्वितीय वर्ष (प्रत्येक अभ्यासक्रम – ६ श्रेयांक)**

| ***(अ) सक्तीचे (पाच पेपर्स) – अभ्यासक्रम*** | ***संपर्कसत्रे*** |
|---|---|
| (१) (COM 208) हिशेबशास्त्र–१ | ९ |
| (२) (ECO 201) व्यवसायिक अर्थशास्त्र | ९ |
| (३) (COM 210) व्यावसायिक कायदे | ९ |
| (४) (MGM 105) व्यवस्थापनशास्त्र | ९ |
| (५) (COM 212) व्यवसाय संघटन व प्रशासन | ९ |
| ***(आ) वैकल्पिक (एक पेपर)*** | |
| (१) (MGM 224) व्यवस्थापकीय अर्थशास्त्र *किंवा* | ९ |
| (२) (MGM 225) व्यवसाय संज्ञापन | ९ |
| ***(इ) ऑडिट कोर्स*** | |
| (१) (EVS 201) पर्यावरण अभ्यास | |

**तृतीय वर्ष (प्रत्येक अभ्यासक्रम ६ श्रेयांक)**

| ***(अ) सक्तीचे (चार पेपर्स) – अभ्यासक्रम*** | ***संपर्कसत्रे*** |
|---|---|
| (१) (COM 209) हिशेबशास्त्र–२ | ९ |
| (२) (COM 220) भारतीय आर्थिक पर्यावरण | ९ |
| (३) (COM 221) परिव्यय अंकेक्षण आणि करआकारणी | ९ |
| (४) (COM 222) मानव संसाधन व्यवस्थापन | ९ |
| ***(आ) विशेषीकरण कोणताही एक विषय (दोन पेपर्स)*** | |
| (१) (COM 306) बँकिंग व फायनान्स – १ | ९ |
| (२) (COM 307) बँकिंग व फायनान्स – २ | ९ |
| किंवा | |
| (३) (MGM 308) विपणन व्यवस्थापन – १ | ९ |
| (४) (MGM 309) विपणन व्यवस्थापन – २ | ९ |

***महत्त्वाचे :***

(१) पदवी द्वितीय व तृतीय वर्षाच्या गुणांवर दिली जाईल.

(२) तृतीय वर्षास 'विशेषीकरण' गटातून एका विषयाचे दोन पेपर्स घ्यावयाचे आहेत. द्वितीय वर्षास 'वैकल्पिक' (Elective) गटातून एक पेपर निवडायचा आहे.

## २.२ अध्ययन पद्धती

ज्या विद्यार्थ्यांना दररोज महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेता येत नाही; तसेच अध्ययन करण्यासाठी पूर्ण वेळ देता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी मुक्त विद्यापीठाने स्वतंत्रपणे अध्ययन पद्धती विकसित केली आहे. त्यात पुढील घटकांचा समावेश आहे.

(१) स्वयं-अध्ययनाधिष्ठित पाठ्यपुस्तके.

(२) तज्ज्ञ प्राध्यापकांचे संपर्कसत्रात मार्गदर्शन.

(३) अध्ययन कालांतर्गत मूल्यमापनाची सोय.

(४) आवश्यक तेथे प्रात्यक्षिकांची संधी.

(५) आभासी वर्गाची (Virtual Class Room) वेब रेडिओ 'यशवाणी' उपलब्धता.

या अध्ययन पद्धतीत विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमाचा तपशील न देता, त्यावरील अध्ययन पुस्तकांचा संचही देण्यात येतो. प्रवेश शुल्कातच ही अध्ययन पुस्तके देण्यात येतात व ती विद्यार्थ्याला स्वतःकडे कायम ठेवता येतात. ही स्वयं-अध्ययन पुस्तके अन्य पाठ्यपुस्तकांपेक्षा निराळ्या पद्धतीने लिहिलेली असतात. ह्या पाठ्यपुस्तकात एका वाचनात समजावून घेता येईल अशा प्रकारे विषयांची छोट्या छोट्या घटकांत विभागणी केलेली असते. उदाहरणार्थ, उदाहरणे, आलेख, चित्रे, इत्यादींच्या साहाय्याने विषयांची मांडणी सुबोधपणे करण्यात येते. ह्या पुस्तकांची छपाई विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभपणे व्हावे या दृष्टीने करण्यात आलेली असते. पुस्तकात प्रत्येक पृष्ठावर दोन्ही बाजूंना मोठा समास सोडलेला असतो. या कोऱ्या जागेत विद्यार्थी ठळक मुद्दे लिहून ठेवू शकतो, त्याला येणाऱ्या शंकांची नोंद करून ठेवू शकतो. अभ्यासविषयाची आवृत्ती करताना या नोंदींची व टिपणांची त्याला मदत होते. तसेच पाठ्यांशाखाली काही प्रश्न दिलेले असतात, तो तो भाग वाचून झाल्यावर हे प्रश्न विद्यार्थ्याने सोडविल्यास तो भाग आपल्याला कितपत समजला ह्याचा त्याला स्वतःलाच पडताळा घेता येतो. जर त्याला काही प्रश्न सोडविता आले नाहीत, तर त्याने तो भाग पुन्हा वाचून उत्तरे मिळवावयाची असतात. एवढे करूनही काही प्रश्नांची उत्तरे मिळू शकले नाहीत तर ते प्रश्न नोंदवून ठेवावेत व अभ्यासकेंद्रावरील संपर्कसत्रात मार्गदर्शक प्राध्यापकांशी (संमंत्रक – Counsellor) चर्चा करून त्याची उत्तरे मिळविता येतात.

विद्यार्थ्याला आपल्या सोईच्या ठिकाणचे अभ्यासकेंद्र निवडता येते. या अभ्यासकेंद्रावर प्रत्येक अभ्यासक्रमासाठी सामान्यतः सुटीच्या दिवशी वा कार्यालयीन वेळेनंतर संपर्कसत्रे घेण्यात येतात. त्या त्या विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शक ह्या संपर्कसत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. मात्र हे मार्गदर्शन केवळ व्याख्यानांच्या स्वरूपाचे असत नाही. मार्गदर्शकाकडून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची/शंकांची उत्तरे मिळविणे, कठीण विषयावर चर्चा-परिसंवाद घडवून आणणे, अंतर्गत मूल्यमापनाच्या माध्यमांतून आपल्या प्रगतीविषयी विद्यार्थ्याला माहिती घेता येते. म्हणून संपर्कसत्रांना विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे.

विद्यार्थ्याने वरील सर्व अध्ययन सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन स्वतःची अभ्यासपद्धती तयार करावी. आपल्याला मिळणारा वेळ लक्षात घेऊन मिळणाऱ्या वेळेचा नियोजनपूर्वक उपयोग करावा. केवळ पाठांतराद्वारे केलेला अभ्यास हा खरा अभ्यास नसून विषयाचे सुस्पष्ट आकलन होणे व त्याचा योग्य ठिकाणी उपयोग करता येणे हे चांगल्या अभ्यासपद्धतीचे मर्म आहे. त्यामुळे प्रात्यक्षिके व सराव यांवर भर देऊन विद्यार्थ्याने अभ्यास करावा अशी अपेक्षा आहे.

## २.३ कालावधी

मुक्त शिक्षणपद्धतीत विद्यार्थी काम करताकरता शिक्षण घेत असल्यामुळे अध्ययन-कालावधीबाबत लवचीक धोरण ठेवण्यात आले आहे. त्यामुळे एका वर्षात करावयाचा अभ्यास विद्यार्थी आपल्या सोईने ते वर्ष संपल्यानंतरही करू शकतो. म्हणून हा पदवी शिक्षणक्रम तीन वर्षांचा असला तरी विद्यार्थ्यांस तो आपल्या सोईने आठ वर्षांपर्यंत पूर्ण करण्याची मुभा देण्यात आली आहे. अभ्यास पूर्ण झाल्याची खात्री झाल्यावर परीक्षा देता येण्याची स्वायत्तता विद्यार्थ्याला देण्यात आली आहे. वर्षअखेरीस होणारी परीक्षा अभ्यास पूर्ण झालेला नसल्यास त्याच वेळी देण्याची सक्ती नाही, तसेच वर्षातून दोन वेळा परीक्षेची संधी उपलब्ध असल्याने विद्यार्थी आपल्या सोईने योग्य वेळी परीक्षा देऊ शकतो. समजा आपण प्रथम किंवा द्वितीय वर्षाची अंतिम परीक्षा दिली परंतु एकही अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करू शकला नाहीत (म्हणजे ४०% गुण) तरी आपणांस द्वितीय /तृतीय वर्षात प्रवेश दिला जाईल. मात्र पहिल्या / दुसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रमांची अंतिम परीक्षा पुढे द्यावी लागेल. ह्या लवचीक पद्धतीचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा व प्रवेश मुदतीत घ्यावा.

## २.४ माध्यम

इंग्रजीच्या अभ्यासक्रमाखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांसाठी मराठी माध्यम राहील. इंग्रजीखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांची पाठ्यपुस्तके, अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन, गृहपाठ व अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मराठी भाषेतूनच राहतील. मात्र प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी मराठी किंवा इंग्रजी भाषेचा वापर करण्याचे स्वातंत्र्य राहील.

## २.५ श्रेयांक

सामान्यतः एका अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याला ३० ते ३५ घड्याळी तासांचा वेळ लागतो. मुक्त शिक्षणपद्धतीत या अध्ययनतासांचे मापन 'श्रेयांका'च्या परिमाणात केले जाते. ३० ते ३५ अध्ययनतासांचा अभ्यास म्हणजे १ श्रेयांक. या अभ्यासात अध्ययन पुस्तकांचे वाचन, टिपणे काढणे, मनन-चिंतन करणे, प्रश्नोत्तरे लिहिणे, संपर्कसत्रातील मार्गदर्शन, इत्यादींचा समावेश आहे.

सामान्यतः सहा श्रेयांकांचा म्हणजेच १८० ते २०० अध्ययन तासांचा एक अभ्यासक्रम असतो. पदवी परीक्षेसाठी एकूण १०८ श्रेयांकांचा अभ्यास पूर्ण करावा लागतो.

# ३. प्रथम वर्ष बी. कॉम.

## ३.१ अभ्यासक्रम

(OPN 101) **स्वयं-अध्ययन कौशल्यांचा अधिष्ठान अभ्यासक्रम**

पुस्तक १ : वाचन व लेखन कौशल्ये

पुस्तक २ : संभाषण व श्रवण कौशल्ये

पुस्तक ३ : निरीक्षण, ग्रंथालय उपयोजन व स्वयंनिर्देशित अध्ययन

(MAR 102) **मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम**

पुस्तक १ : भाषिक विनिमय : तत्त्व आणि व्यवहार
पुस्तक २ : मराठीचा भाषिक वापर : कार्यपुस्तिका
पुस्तक ३ : भाषिक सर्जनशीलता : स्वरूप आणि प्रकार
पुस्तक ४ : मराठी भाषेचा सर्जनशील वापर : कार्यपुस्तिका

(HEN 101)**हिंदी व इंग्रजी या भाषांचा अधिष्ठान अभ्यासक्रम**

पुस्तक १ : हिंदी भाषा का परिचय और उसकी संरचना
पुस्तक २ : हिंदी भाषा का परिचय और उसकी संरचना : कार्यपुस्तिका
पुस्तक ३ : Foundation Course in English
पुस्तक ४ : Foundation Course in English : Work Book

(GKN 101) **सामान्य ज्ञान व सामाजिक जाणिवांचा अधिष्ठान अभ्यासक्रम**

पुस्तक १ : विज्ञान–तंत्रज्ञान, पर्यावरण आणि आरोग्य
पुस्तक २ : विकास : संकल्पना आणि मार्ग
पुस्तक ३ : संज्ञापन क्रांती आणि जैवतंत्रज्ञान

(COM 106) **वाणिज्यशास्त्र**

पुस्तक १ : अर्थशास्त्र परिचय व वाणिज्याची उत्क्रांती
पुस्तक २ : वाणिज्य व्यवहार पद्धती
पुस्तक ३ : लेखापालन

(COM 211) **कार्यालयीन व्यवस्थापन**

पुस्तक १ : कार्यालय : रचना व कार्यपद्धती
पुस्तक २ : कार्यालय संघटना व कर्मचारी व्यवस्थापन
पुस्तक ३ : दप्तर व्यवस्थापन व जनसंपर्क

## ३.२ प्रवेश पात्रता

खालीलपैकी कोणतीही एक पात्रता पूर्ण असणाऱ्या व्यक्ती :

(१) य.च.म.मुक्त विद्यापीठ पूर्वतयारी शिक्षणक्रम उत्तीर्ण व १ जुलै रोजी वय वर्षे १८ पूर्ण असणे आवश्यक.

(२) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची इयत्ता बारावी (एच.एस.सी.) किंवा इतर राज्यांतील १२ वी समकक्ष परीक्षा उत्तीर्ण.

(३) १९७५ पूर्वीची माध्यमिक शालांत परीक्षा (११ वी) उत्तीर्ण.

(४) एस.एस.सी. उत्तीर्ण झाल्यानंतर सलग किमान २ वर्षे मुदतीचा सरकारमान्य पदविका/प्रमाणपत्र शिक्षणक्रम उत्तीर्ण. उदाहरणार्थ, डी.सी.ई, डी.एम.ई., डी.ई.ई., डी.फार्म, डेअरी टेक., टी.डी., ए.टी.डी., एन.सी.टी.व्ही.टी., आय.टी.आय., एम.सी.व्ही.सी.

(५) य. च. म. मुक्त विद्यापीठाचा स्वयं–साहाय्य गट प्रेरक–प्रेरिका शिक्षणक्रम उत्तीर्ण असणारे. [विद्वत परिषद सभा ठराव क्र. बी१००/०५/४१ (बी –१/एफ–१७३/२००५/६३) दि. २४/२/०५]

**विशेष सूचना**

(१) प्रवेश–अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे अत्यंत आवश्यक आहे.

(अ) शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रमाणित सत्यप्रत (Attested photo copy).

(आ) शैक्षणिक पात्रतेबाबतच्या (Attested photo copy) गुण–पत्रकांच्या प्रमाणित सत्यप्रती.

(२) **विद्यार्थ्यांनी प्रवेश–अर्जासोबत कोणत्याही प्रमाणपत्राची मूळ प्रत जोडू नये.** जोडल्यास विद्यापीठ सदर प्रत/प्रती परत पाठविणार नाही व या संदर्भात पत्रव्यवहार केला जाणार नाही.

## ३.३ शिक्षणक्रम शुल्क

| | | |
|---|---|---|
| विद्यापीठ शुल्क (ऑनलाईन) | : | रु. १०००=०० |
| अभ्यासकेंद्र शुल्क **(अभ्यासकेंद्रावर भरावे)** | : | रु. ५००=०० |
| **एकूण शिक्षणक्रम शुल्क** | **:** | **रु. १५००=००** |

## विद्यापीठ शुल्काचा तपशील

| *अ.क्र.* | *शुल्काचे शीर्षक* | *शुल्क* |
|---|---|---|
| ०१. | प्रवेश व नोंदणी शुल्क | १००=०० |
| ०२. | शैक्षणिक शुल्क | २५०=०० |
| ०३. | परीक्षा (अंतर्गत/अंतिम) शुल्क | २५०=०० |
| ०४. | संकीर्ण | १५०=०० |
| ०५. | विकास निधी | २५०=०० |
| | **एकूण शुल्क रु.** | **१०००=००** |

**शुल्क भरण्यासंबंधी सूचना –**

(१) विद्यापीठ शिक्षणक्रम शुल्क रु. १,०००/– विद्यापीठाने निर्धारित केलेल्या पद्धतीनेच (ऑनलाईन) भरावे.

(२) अभ्यासकेंद्र शुल्क अभ्यासकेंद्रावर भरून त्याची पावती घ्यावी.

# ४. द्वितीय वर्ष बी. कॉम.

## ४.१ अभ्यासक्रम

पुनर्रचित अभ्यासक्रम जून २००० पासून सुरू करण्यात आला आहे. यात प्रथम वर्षास सक्तीचा ३६ श्रेयांकांचा अधिष्ठान अभ्यासक्रम देण्यात आला आहे. ६ श्रेयांकांचा १, या प्रमाणे ६ अभ्यासक्रम प्रथम वर्षास आहेत. द्वितीय वर्ष बी.कॉम. वर्गाचा पुनर्रचित अभ्यासक्रम जून २००१ पासून सुरू करण्यात आला आहे आणि तृतीय वर्ष बी.कॉम.चा अभ्यासक्रम जून २००३ पासून सुरू करण्यात आलेला आहे. पुनर्रचित द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमात ५ अनिवार्य व १ वैकल्पिक अभ्यासक्रम आहे. तर तृतीय वर्ष बी.कॉम.साठी ४ अनिवार्य आणि विशेषीकरणाच्या एका विषयाचे दोन अभ्यासक्रम आहेत. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे.

| *द्वितीय वर्ष बी.कॉम.* | *संपर्कसत्रे* |
|---|---|
| **(अ) अनिवार्य/सक्तीचे** | |
| (१) (COM 208) हिशेबशास्त्र – भाग एक | १२ |
| (२) (ECO 201) व्यवसाय अर्थशास्त्र | ०९ |
| (३) (COM 210) व्यावसायिक कायदे | ०९ |
| (४) (MGM 105) व्यवस्थापन शास्त्र | ०९ |
| (५) (COM 212) व्यवसाय संघटन व प्रशासन | ०९ |
| **(आ) वैकल्पिक/ऐच्छिक (कोणताही एक)** | |
| (१) (MGM 224) व्यवस्थापकीय अर्थशास्त्र<br>किंवा | ०९ |
| (२) (MGM 225) व्यवसाय संज्ञापन | ०९ |
| (इ) (१) (EVS 201) ऑडिट कोर्स – पर्यावरण अभ्यास | -- |

### विशेष सूचना

**(१) द्वितीय वर्ष बी.कॉम. साठी प्रवेश-अर्ज भरताना माहिती-पुस्तिकेतील अभ्यासक्रमात (✓) अशी खूण करावी. तसेच प्रवेश-अर्जात विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम संकेतांक व विषयाचे नाव लिहावे.**

## द्वितीय वर्ष बी.कॉम. : अभ्यासक्रम

### ■ (COM 208) हिशेबशास्त्र – भाग एक

**पुस्तक पहिले : बँक जुळवणी पत्रक, व्यापारी विपत्रे आणि घसारा**

घटक १ : बँक जुळवणी पत्रक

घटक २ : व्यापारी विपत्रे : हुंड्यांचे व्यवहार

घटक ३ : घसारा

**पुस्तक दुसरे : भागीदारी लेखे**

घटक ४ : भागीदारी

घटक ५ : (अ) : भागीदारीचे अंतिम लेखे (भागीदारीची तेरीज)
(आ) : भागीदारीचे अंतिम लेखे (विविध दुरुस्त्या, तरतुदी किंवा समायोजन)
(इ) : भागीदारी : उत्पादन खाते, व्यापार खाते, नफातोटा खाते आणि ताळेबंद

**पुस्तक तिसरे : भागीदारी व अव्यापारी संस्थांचे लेखे**

घटक ६ : भागीदाराचा प्रवेशलेखे

घटक ७ : भागीदाराची निवृत्ती

घटक ८ : भागीदारीचे विसर्जन

घटक ९ : अव्यापारी संस्थांचे लेखे

### ■ (ECO 201) व्यवसाय अर्थशास्त्र

**पुस्तक पहिले : व्यवसाय-संस्था व मागणीचे विश्लेषण**

*भाग-१*

घटक १ : (अ) : काही मूलभूत संकल्पना : संयंत्र, व्यवसाय-संस्था व उद्योग
(आ) : व्यवसाय-संस्थेची उद्दिष्टे
(इ) : व्यवसाय-संस्थेच्या निर्णय-प्रक्रियेवर प्रभाव पाडणारे घटक

घटक २ : (अ) : व्यवसाय-संस्थेचे आकारमान : मापन व निर्धारण
(आ) : लघुउद्योग : स्वरूप, महत्त्व आणि समस्या

*भाग-२*

घटक १ : (अ) : मागणी : संकल्पना आणि स्वरूप
(आ) : मागणीतील बदल आणि मागणी सिद्धान्त

घटक २ : मागणीची लवचीकता

घटक ३ : भविष्यकालीन मागणीचे पूर्वानुमान

**पुस्तक दुसरे : पुरवठा व बाजारातील परिस्थिती**

*भाग-१*

घटक १ : उत्पादन परिव्यय

घटक २ : (अ) : उत्पादन परिव्यय आणि उत्पादन
(आ) : 'ना नफा, ना तोटा' उत्पादन बिंदू

घटक ३ : पुरवठ्याची लवचीकता

*भाग-२*

घटक १ : (अ) : मूलभूत संकल्पना
(आ) : पूर्ण स्पर्धेतील किंमत निर्धारण

घटक २ : (अ) : एकाधिकार
(आ) : एकाधिकारयुक्त स्पर्धा

घटक ३ : (अ) : अल्पजनाधिकार
(आ) : किंमत निर्धारणाच्या पद्धती

**पुस्तक तिसरे : श्रमबाजार व भांडवल गुंतवणूक**

*भाग–१*

घटक १ : पूर्ण आणि अपूर्ण स्पर्धा

घटक २ : वेतन निर्धारण पद्धती

घटक ३ : कामगार संघ

घटक ४ : औद्योगिक विवाद

*भाग–२*

घटक १ : (अ) : भांडवल संकल्पनेचा अधिक परिचय

(आ) : भांडवलाच्या मागणीचे विवेचन : नवी गुंतवणूक व पुनःप्रस्थापन

(इ) : व्याजाचे दर आणि गुंतवणुकीसाठी मागणी

(ई) : धोका, अनिश्चितता आणि गुंतवणूकविषयक निर्णय

घटक २ : (अ) : अंतर्गत आणि बाह्य स्रोत

(आ) : भांडवलबाजार

(इ) : भांडवलपुरवठा करणाऱ्या महत्त्वाच्या संस्था

## ■ (COM 210) व्यावसायिक कायदे

**पुस्तक पहिले : भारतीय करार व चलनक्षम दस्तऐवज कायदा**

घटक १ : भारतीय करार कायदा १८७२ : भाग – १

घटक २ : भारतीय करार कायदा १८७२ : भाग – २

घटक ३ : चलनक्षम दस्तऐवज कायदा १८८१ : भाग –१

घटक ४ : चलनक्षम दस्तऐवज कायदा १८८१ : भाग –२

**पुस्तक दुसरे : मालविक्री व कारखाना कायदा**

घटक ५ : मालविक्री कायदा १९३० – भाग १

घटक ६ : मालविक्री कायदा १९३० – भाग २

घटक ७ : कारखाना कायदा १९४८ – भाग १

घटक ८ : कारखाना कायदा १९४८ – भाग २

**पुस्तक तिसरे : औद्योगिक कलह व वेतन कायदा**

घटक ९ : औद्योगिक कलह कायदा १९४७

घटक १०: ग्राहक संरक्षण कायदा १९८६

घटक ११: वेतन देण्याचा कायदा १९३६

घटक १२: किमान वेतन कायदा १९४८

## ■ (MGM 105) व्यवस्थापनशास्त्र

**पुस्तक पहिले : व्यवस्थापन व त्याचे स्वरूप**

घटक १ : व्यवस्थापन : अर्थ, महत्त्व, आवश्यकता व वैशिष्ट्ये आणि व्याप्ती

घटक २ : व्यवस्थापकीय विचारांचा अभ्यास

घटक ३ : व्यवस्थापनाची जबाबदारी आणि व्यवस्थापन

**पुस्तक दुसरे : व्यवस्थापन : विकास व कार्ये**

घटक ४ : व्यवस्थापन विकास

घटक ५ : व्यवस्थापकीय कार्ये : नियोजन

घटक ६ : व्यवस्थापकीय कार्ये : निर्णय

**पुस्तक तिसरे : व्यवस्थापकीय कार्ये**

घटक ७ : व्यवस्थापकीय कार्ये : संघटन

घटक ८ : व्यवस्थापकीय कार्ये : संचलन आणि सुसूत्रीकरण

घटक ९ : व्यवस्थापकीय कार्ये : अभिप्रेरण व नियंत्रण

## ■ (COM 212) व्यवसाय संघटन व प्रशासन

**पुस्तक पहिले : औद्योगिक संघटन, उद्योगाचे स्थानिकीकरण व लघुउद्योग**

*भाग १*

घटक १ : औद्योगिक संघटन – प्रकार

घटक २ : औद्योगिकरणाची प्रक्रिया व ती ठरविणारे घटक

घटक ३ : व्यवसाय संघटन आणि कार्यपद्धती

*भाग २*

घटक १ : स्थानिकीकरण

घटक २ : विकेंद्रीकरण

घटक ३ : लघुउद्योग : महत्त्व

घटक ४ : लघुउद्योग : धोरण

**पुस्तक दुसरे : उद्योग : आकार, संयोग व भांडवल**

*भाग १*

घटक १ : उद्योग आकार

घटक २ : उद्योग वर्गवारी

घटक ३ : भारतातील औद्योगिक संयोग

*भाग २*

घटक १ : औद्योगिक भांडवल व त्याचे नियोजन

घटक २ : चालू भांडवल व स्थिर भांडवल

घटक ३ : भांडवल उभारण्याच्या विविध पद्धती

घटक ४ : भांडवल पुरविणाऱ्या विविध संस्था

**पुस्तक तिसरे : उद्योग संबंध व व्यवस्थापन**

*भाग १*

घटक १ : भारतातील औद्योगिक संबंध

घटक २ : शास्त्रीय व्यवस्थापन

घटक ३ : विवेकीकरण

*भाग २*

घटक १ : कर्मचारी व्यवस्थापन

घटक २ : विपणन व्यवस्थापन

घटक ३ : वित्तीय व्यवस्थापन

घटक ४ : उत्पादन व्यवस्थापन

## ■ (MGM 224) व्यवस्थापकीय अर्थशास्त्र

**पुस्तक पहिले : व्यवस्थापकीय अर्थशास्त्रः स्वरूप व संकल्पना**

घटक १ (अ) : व्यवस्थापकीय अर्थशास्त्र : स्वरूप, उद्दिष्टे व व्याप्ती
(आ) : आर्थिक विश्लेषण
(इ) : आर्थिक विश्लेषणाच्या पद्धती
(ई) : मूलभूत संकल्पना

घटक २ (अ) : व्यवस्थापनविषयक निर्णयांचे स्वरूप
(आ) : व्यवस्थापकीय अर्थशास्त्राची अभ्यासपद्धती
(इ) : काही मूलभूत संकल्पना : संयंत्र, व्यवसाय संस्था व उद्योग
(ई) : व्यवसाय संस्थेचे आकार
(उ) : व्यावसायिक निर्णय

घटक ३ : मागणीची संकल्पना
घटक ४ : मागणीचे विश्लेषण
घटक ५ : मागणीची लवचीकता आणि अंदाज
घटक ६ : मागणीचे पूर्वानुमान

**पुस्तक दुसरे : बाजार आणि किंमत निर्धारण**

घटक ७ : उत्पादन परिव्यय : संकल्पना, प्रकार आणि वक्र
घटक ८ : उत्पादन फल
घटक ९ : 'ना नफा, ना तोटा' उत्पादन बिंदू
घटक १० : पुरवठा
घटक ११ : बाजारातील परिस्थिती आणि किंमत–उत्पादन निर्णय
घटक १२ : बाजार संरचनेचे विश्लेषण (१)
घटक १३ : बाजार संरचनेचे विश्लेषण (२)
घटक १४ : किंमत निर्धारणाची तत्त्वे आणि व्यूह

**पुस्तक तिसरे : व्यवसायसंस्थेचे सिद्धान्त व गुंतवणूक विश्लेषण**

घटक १५ : व्यवसायसंस्था : मूलभूत दृष्टिकोन
घटक १६ : व्यवसायसंस्थेचा वर्तणुकीचा सिद्धांत
घटक १७ : व्यवसायसंस्थेचे व्यवस्थापकीय सिद्धांत
घटक १८ : नफा : संकल्पना व विश्लेषण
घटक १९ : भांडवलाचे अर्थसंकल्पन
घटक २० : जोखीम, निश्चितता व अनिश्चितता
घटक २१ : सरकारी गुंतवणुकीचे निर्णय

## ■ (MGM 225) व्यवसाय संज्ञापन

**पुस्तक पहिले : संज्ञापनाची मूलतत्त्वे व माध्यमे**

घटक १ : संदेशप्रक्रिया
घटक २ : संज्ञापनाची तत्त्वे
घटक ३ : संज्ञापनाची विभिन्न माध्यमे
घटक ४ : संज्ञापनाच्या आधुनिक पद्धती व साधने

**पुस्तक दुसरे : लेखी व तोंडी संज्ञापन**

घटक ५ : (अ) : लेखी संज्ञापनाचे महत्त्व व प्रकार
(आ) : पत्रलेखनाचे प्रकार
(इ) : अहवाल
घटक ६ : तोंडी संज्ञापन

**पुस्तक तिसरे : प्रभावी संज्ञापन आणि मानवी संबंध**

घटक ७ : संज्ञापनातील अडथळे
घटक ८ : प्रभावी संज्ञापन
घटक ९ : संज्ञापन आणि मानवी संबंध
घटक १० : व्यवस्थापकीय कार्यक्षमतेत संज्ञापनाचे महत्त्व

**ऑडिट कोर्स**

पुस्तक १ : पर्यावरण अभ्यास

पर्यावरण अभ्यास हा अभ्यासक्रम ४ श्रेयांकांचा असून विद्यार्थ्यांस ऑडिट कोर्स म्हणून घेणे अनिवार्य आहे. सदर अभ्यासक्रमाचे स्वतंत्र पुस्तक देण्यात येईल. या विषयात किमान 'C' श्रेणी मिळवावी लागेल.

## ४.२ प्रवेश पात्रता

खालीलपैकी कोणतीही एक पात्रता पूर्ण असणाऱ्या व्यक्ती –

(१) य.च.म.मुक्त विद्यापीठात यापूर्वी प्रथम वर्ष बी.कॉम.ला प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी.

(२) १२वी उत्तीर्णतेनंतर शासनमान्य व मान्यताप्राप्त विद्यापीठातील बी.कॉम. विद्याशाखेतील प्रथम वर्ष पदवी परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या सरळ प्रवेशाच्या नियमानुसार द्वितीय वर्षास प्रवेश मिळेल; म्हणजेच मुक्त विद्यापीठाच्या पहिल्या वर्षाच्या सर्व विषयांची (३६ श्रेयांकांचे ६ अभ्यासक्रम) त्यास सूट देण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश–अर्जावर सरळ प्रवेश असे स्पष्ट लिहावे आणि प्रथम वर्ष पदवी उत्तीर्ण असल्याची संबंधित विद्यापीठाच्या गुणपत्रकाची प्रमाणित फोटोप्रत जोडणे आवश्यक आहे.

## ४.३ शिक्षणक्रम शुल्क

| | |
|---|---|
| विद्यापीठ शुल्क (ऑनलाईन) | : रु. १५००=०० |
| अभ्यासकेंद्र शुल्क (अभ्यासकेंद्रावर भरणे) | : रु. ६००=०० |
| **एकूण शुल्क** | **: रु. २१००=००** |

## विद्यापीठ शुल्काचा तपशील

| *अ.क्र.* | *शुल्काचे शीर्षक* | *शुल्क (रु.)* |
|---|---|---|
| ०१. | प्रवेश व नोंदणी शुल्क | १००=०० |
| ०२. | शैक्षणिक शुल्क | ४००=०० |
| ०३. | परीक्षा (अंतर्गत/अंतिम) शुल्क | ४००=०० |
| ०४. | संकीर्ण | १५०=०० |
| ०५. | विकास निधी | ४५०=०० |
| | **एकूण शुल्क (रु.)** | **१५००=००** |

**शुल्क भरण्यासंबंधी सूचना –**

(१) विद्यापीठ शिक्षणक्रम शुल्क रु. १,५००/– विद्यापीठाने निर्धारित केलेल्या पद्धतीनेच (ऑनलाईन) भरावे.

(२) अभ्यासकेंद्र शुल्क अभ्यासकेंद्रावर भरून त्याची पावती घ्यावी.

# ५. तृतीय वर्ष बी. कॉम.

## ५.१ अभ्यासक्रम

पुनर्रचित अभ्यासक्रम जून २००० पासून सुरू करण्यात आला आहे. यात प्रथम वर्षास सक्तीचा ३६ श्रेयांकांचा अधिष्ठान अभ्यासक्रम देण्यात आला आहे. ६ श्रेयांकांचा १, या प्रमाणे ६ अभ्यासक्रम प्रथम वर्षास आहेत. द्वितीय वर्ष बी.कॉम. वर्गाचा पुनर्रचित अभ्यासक्रम जून २००१ पासून सुरू करण्यात आला आहे आणि तृतीय वर्ष बी.कॉम.चा अभ्यासक्रम जून २००३ पासून सुरू करण्यात आलेला आहे. पुनर्रचित द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमात ५ अनिवार्य व १ वैकल्पिक अभ्यासक्रम आहे. तर तृतीय वर्ष बी.कॉम.साठी ४ अनिवार्य आणि विशेषीकरणाच्या एका विषयाचे दोन अभ्यासक्रम आहेत. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे.

| *तृतीय वर्ष बी.कॉम.* | *संपर्कसत्रे* |
|---|---|
| **(अ) अनिवार्य** | |
| (१) (COM 209) हिशेबशास्त्र – भाग दोन | १२ |
| (२) (COM 220) भारतीय आर्थिक पर्यावरण | ०९ |
| (३) (COM 221) परिव्यय अंकेक्षण आणि कर आकारणी | ०९ |
| (४) (COM 222) मानवी संसाधन | ०९ |
| **(आ) विशेषीकरण (खालीलपैकी एका विषयाचे दोन पेपर्स)** | |
| (१) (COM 306) बँकिंग व फायनान्स – १ | ०९ |
| (२) (COM 307) बँकिंग व फायनान्स – २ | ०९ |
| किंवा | |
| (३) (MGM 308) विपणन व्यवस्थापन – १ | ०९ |
| (४) (MGM 309) विपणन व्यवस्थापन – २ | ०९ |

### विशेष सूचना

(१) द्वितीय/तृतीय वर्ष बी.कॉम. साठी प्रवेश–अर्ज भरताना माहिती–पुस्तिकेतील अभ्यासक्रमात (✓) अशी खूण करावी. तसेच प्रवेश–अर्जात विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम संकेतांक व विषयाचे नाव लिहावे.

## तृतीय वर्ष बी.कॉम. : अभ्यासक्रम

### ■ (COM 209) हिशेबशास्त्र – भाग दोन

**पुस्तक पहिले : गुंतवणूक व कृषी लेखे**

गुंतवणूक लेखे, भाडेखरेदी व हप्तेबंद खरेदी पद्धत, कृषी उद्योग लेखे,

**पुस्तक दुसरे : प्रमंडळ लेखे**

प्रमंडळ लेखे – १, प्रमंडळ लेखे – २

**पुस्तक तिसरे : बँक व विमा प्रमंडळ लेखे**

बँक प्रमंडळ लेखे व अंतिम लेखे, विमा प्रमंडळ लेखे व अंतिम लेखे व संगणकीकृत हिशेबशास्त्राची ओळख.

### ■ (COM 220) भारतीय आर्थिक पर्यावरण

**पुस्तक पहिले: आर्थिक पर्यावरण**

घटक १ : प्रास्ताविक – संकल्पना, घटक, पर्यावरणावर परिणाम करणारे घटक, पर्यावरणाचे प्रकार, पर्यावरण व्यवस्थापन, पर्यावरण – मानव व विकास

घटक २ : आर्थिक पर्यावरणाचे महत्त्व, भारतीय नियोजनाचे पाच दशकांतील बदलते आर्थिक चित्र

घटक ३ : वने, पाणी व ऊर्जा यांच्या विशेष संदर्भात भारतातील नैसर्गिक स्रोत (साधनसामग्री)

**पुस्तक दुसरे : कृषी, उद्योग व सेवा क्षेत्र**

घटक ४ : शेती – धारणा आकार, जमिनीचा वापर, पीक पद्धती, उत्पादकता, कृषी उत्पादन

घटक ५ : कारखाने – स्वातंत्र्योत्तर काळातील लघू, मध्यम आणि मोठ्या प्रमाणावरील उद्योगांचा औद्योगिक विकास, लघू व मध्यम उद्योगधंदे आणि त्यांच्या समस्यां–बाबतीत शासनाचे धोरण

घटक ६ : पायाभूत सुविधांचा विकास

**पुस्तक तिसरे : आर्थिक धोरण व नियोजन**

घटक ७ : भारतातील आर्थिक धोरणे – नाणेविषयक, वित्तीय आणि परदेशी व्यापार, परदेश सहयोग व बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका

घटक ८ : औद्योगिक कामगारासंबंधी शासकीय धोरण, मालकी व व्यवस्थापनातील सहभाग, सार्वजनिक खर्च व सार्वजनिक कर्ज

घटक ९ : भारतीय नियोजन – वैशिष्ट्ये, पंचवार्षिक नियोजनाचे यश व अपयश – मानव संसाधन विकसन – धोरणे व कृती, राष्ट्रीय लोकसंख्या धोरण

### ■ (COM 221) परिव्यय, अंकेक्षण आणि कर आकारणी

**पुस्तक पहिले : अंकेक्षण**

अंकेक्षण/हिशेबतपासणी, चुकांचे व फसवणूक – अपहार – लबाडीचे प्रकार, अंकेक्षणाचे विविध प्रकार/वर्ग, अंकेक्षण कार्यक्रम – अंकेक्षण वही – कार्यपत्रे, अंतर्गत तपासणी, तपासणी व

व्हौचर तपासणी – संपत्ती व देयतेचे मूल्यमापन व तपासणी, कंपनीचा हिशेब तपासनीस – पात्रता – अपात्रता – नेमणूक.

**पुस्तक दुसरे : परिव्यय लेखांकन**

परिव्यय लेखांकन परिचय, वित्तीय व परिव्यय लेखांकनातील फरक / भेद, परिव्यय एकक आणि परिव्यय केंद्र, परिव्यय घटक आणि परिव्यय पत्र

**पुस्तक तिसरे : आयकर**

उत्पन्न कर कायदा १९६२, व्याप्ती व उद्दिष्टे, व्याख्या, उत्पन्न, व्यक्ती, शेती उत्पन्न, सूट उत्पन्न, भांडवली व महसुली प्राप्ती आणि खर्चाच्या संकल्पना

### ■ (COM 222) मानवी संसाधन व्यवस्थापन

**पुस्तक पहिले : मानव संसाधन**

मानव संसाधन व्यवस्थापनाचे स्वरूप आणि व्याप्ती,मानव संसाधन विकसन आणि संघटन, कार्यविश्लेषण

**पुस्तक दुसरे : मानव संसाधन नियोजन**

मानव संसाधन नियोजन, भरती, निवड, परिचयसत्र आणि कार्यनिर्धारण

**पुस्तक तिसरे : मानव संसाधन विकास**

प्रशिक्षण व विकसन, कार्यसिद्धी मूल्यमापन आणि कार्य मूल्यमापन

### ■ (COM 306) बँकिंग व वित्त – १

पुस्तक पहिले : बँक व्यवसाय

व्यापारी बँका अर्थ आणि कार्ये, बँकिंग व्यवसायाची मूलतत्त्वे आणि ताळेबंद, बँकेमध्ये खाते उघडणे आणि खात्यावरील व्यवहार

पुस्तक दुसरे : बँक व्यवसाय व कायदे

तारण म्हणून स्वीकारण्यात येणारी मालमत्ता आणि तारणाचे प्रकार, भारतातील व्यापारी बँकिंगच्या क्षेत्रातील सुधारणा, बँकिंग व्यवसायाशी संबंधित कायदे

पुस्तक तिसरे : बँकांचे प्रकार

प्रादेशिक ग्रामीण बँका, सहकारी बँका आणि खाजगी बँका, भारतीय रिझर्व बँक

### ■ (COM 307) बँकिंग व वित्त – २

**पुस्तक पहिले : भांडवल बाजार**

नाणे बाजार, भांडवल बाजार, परकीय चलन बाजार

**पुस्तक दुसरे : वित्तीय संस्था – १**

विकास बँका, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था

**पुस्तक तिसरे : वित्तीय संस्था – २**

वित्तीय बाजाराशी निगडित असलेल्या संस्था, बँकेतर वित्तीय संस्था, प्रकल्प मूल्यमापन आणि वसुली

### ■ (MGM 308) विपणन व्यवस्थापन – १

**पुस्तक पहिले : विपणन**

बाजारपेठ आणि विपणन, विपणन पर्यावरण, विपणन व्यवस्थापन आणि नियोजन, बाजारपेठ खंडीकरण आणि लक्ष्य

**पुस्तक दुसरे : विपणन मिश्र**

विपणन मिश्र, सेवांचे विपणन

**पुस्तक तिसरे : विपणन माहिती**

विपणन माहिती व्यवस्था, विपणन संशोधन, विपणन नियंत्रण

### ■ (MGM 309) विपणन व्यवस्थापन – २

**पुस्तक पहिले : जाहिरात**

जाहिरात, जाहिरात मोहीम, जाहिरातीचे संघटन

**पुस्तक दुसरे : विक्रयकला**

विक्रय अनुमान, विक्रयकला आणि विक्रीवृद्धी, विक्रेता संच व्यवस्थापन

**पुस्तक तिसरे : ग्राहक समाधान**

ग्राहक वर्तन, ग्राहक समाधान व्यवस्थापन, विपणन अंकेक्षण

## ५.२ प्रवेश–पात्रता

खालीलपैकी कोणतीही एक पात्रता पूर्ण असणाऱ्या व्यक्ती

(१) य.च.म.मुक्त विद्यापीठात यापूर्वी द्वितीय वर्षात (बी.कॉम.) प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी

## ५.३ शिक्षणक्रम शुल्क

| | | |
|---|---|---|
| विद्यापीठ शुल्क (ऑनलाईन) | : रु. | १५००=०० |
| अभ्यासकेंद्र शुल्क (अभ्यासकेंद्रावर भरणे) | : रु. | ८००=०० |
| **एकूण शुल्क** | **: रु.** | **२३००=००** |

## विद्यापीठ शुल्काचा तपशील

| *अ.क्र.* | *शुल्काचे शीर्षक* | *शुल्क (रु.)* |
|---|---|---|
| ०१. | प्रवेश व नोंदणी शुल्क | १००=०० |
| ०२. | शैक्षणिक शुल्क | ४००=०० |
| ०३. | परीक्षा (अंतर्गत/अंतिम) शुल्क | ७००=०० |
| ०४. | संकिर्ण | १५०=०० |
| ०५. | विकास निधी | १५०=०० |
| | **एकूण शुल्क (रु.)** | **१५००=००** |

### शुल्क भरण्यासंबंधी सूचना –

(१) विद्यापीठ शिक्षणक्रम शुल्क रु. १,५००/– विद्यापीठाने निर्धारित केलेल्या पद्धतीनेच (ऑनलाईन) भरावे.

(२) अभ्यासकेंद्र शुल्क अभ्यासकेंद्रावर भरून त्याची पावती घ्यावी.

## ५.४ मूल्यमापन प्रक्रिया (द्वितीय व तृतीय वर्ष)

■ **अंतिम मूल्यमापन**

प्रत्येक अभ्यासक्रमाची ८० गुणांची ३ तास वेळ असणारी अंतिम परीक्षा घेण्यात येईल. साधारणतः अंतिम परीक्षा मे महिन्यात असेल. अंतिम परीक्षेचे स्वरूप पुढीलप्रमाणे –

(१) **लघुत्तरी प्रश्न :** २० प्रश्न (२० पैकी १६ प्रश्न सोडविणे) प्रत्येक प्रश्न ५ गुणांचा, असे ८० गुणांचे प्रश्न असतील. यात मुद्देसूद व संक्षिप्त स्वरूपात उत्तरे लिहिता येतील असे प्रश्न असतील.

**स्वाध्याय (गृहपाठाचे) मूल्यमापन**

स्वाध्याय (गृहपाठ) सरावासाठी आवश्यक असल्याने ते विद्यार्थ्यांना पूर्ण करावयाचे आहेत. तथापि स्वाध्यायाला गुण देऊ नये. मात्र अभ्यासकेंद्राने स्वाध्याय तपासून विद्यार्थ्याने समाधानपूर्वक स्वाध्याय पूर्ण केल्याचे प्रमाणित करावे व तपशिलाची प्रत विभागीय केंद्राला सादर करावी. स्वाध्याय अभ्यासकेंद्रांनीच द्यावयाचे आहेत.

# ६. सरळ प्रवेशाबाबत

## ६.१ सरळ प्रवेश नियम

सरळ प्रवेश नियमानुसार प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी पूर्वी पूर्ण केलेल्या शैक्षणिक कार्याचे मूल्य लक्षात घेऊन त्यांना या विद्यापीठाचा पदवी शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी काही श्रेयांकांची सूट देण्यात येते. याबाबतचा नियम खालीलप्रमाणे आहे.

(१) **द्वितीय वर्ष बी.कॉम. प्रवेशाबाबत :** इतर मान्यताप्राप्त विद्यापीठातील प्रथम वर्ष बी.कॉम. उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्ष बी.कॉम.ला प्रवेश घेता येईल.

**(अ) सरळ प्रवेश–अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

(१) जन्मतारखेचा पुरावा (प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळा सोडल्याचा दाखला अथवा प्रमाणपत्र) सत्यप्रत (Attested photo copy)

(२) अभ्यासकेंद्रावर प्रवेश–अर्ज जमा करतेवळी आपण मूळ गुणपत्रके व मूळ जन्मदाखला आणि त्याच्या झेरॉक्स प्रती अभ्यासकेंद्रात घेऊन जाव्यात. केंद्रप्रमुख किंवा केंद्रसंयोजक मूळ प्रतींवरून फोटो प्रत प्रमाणित करून सही–शिक्का करतील. त्याचवेळी आपण मूळ प्रती परत घेऊन जा. मूळप्रती सांभाळण्याची जबाबदारी अभ्यासकेंद्र किंवा विद्यापीठ मुख्यालयावर राहणार नाही. केंद्रप्रमुख किंवा केंद्रसंयोजक विद्यार्थ्यांच्या अर्जाला प्रमाणित सत्यप्रती जोडतील. त्या गहाळ होणार नाहीत याची काळजी घेण्यात येईल.

माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचल्यानंतरच प्रवेश–अर्ज भरावा. त्यासोबत वर उल्लेखिलेली कागदपत्रे आणि प्रवेशशुल्काची पूर्ण रक्कम विद्यापीठाच्या विहित पद्धतीनेच भरावी.

## ६.२ द्वितीय वर्ष वाणिज्य शिक्षणक्रमाकरिता सरळ प्रवेश शुल्क

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) द्वितीय वर्ष शुल्क | : | रु. | १५००=०० |
| (ब) सरळ प्रवेश शुल्क | : | रु. | १५००=०० |
| विद्यापीठ शुल्क | : | रु. | ३०००=०० |
| अभ्यासकेंद्र शुल्क | : | रु. | ६००=०० |
| **एकूण शुल्क** | **:** | **रु.** | **३६००=००** |

यात नोंदणी शुल्क, शिक्षणक्रम शुल्क, मूल्यमापन शुल्क (अंतर्गत व अंतिम), विद्यापीठ विकास निधी, संकीर्ण, इत्यादींचा अंतर्भाव आहे. संवाद अंक हा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.
विद्यापीठ शुल्क रु. ३,०००/– विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या पद्धतीनेच (ऑनलाईन) भरावे.

# ७. नोंदणी प्रक्रिया

(१) विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने निर्धारित केलेल्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेप्रमाणे नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी.

(२) ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मिळालेली पावती अभ्यासकेंद्रावर दाखवून आपला प्रवेश निश्चित करावा.

# ८. विभागीय केंद्रे

(१) **अमरावती :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय केंद्र,
व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड, पोस्ट व्ही.एम.व्ही.
अमरावती – ४४४ ६०४
✆ : (०७२१) २५३१४४५ / २५३१२१०
फॅक्स : (०७२१) २५३१४४४

(२) **औरंगाबाद :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे औरंगाबाद विभागीय केंद्र
सर्व्हे नं. ४१, सैनिकी मुलांच्या वसतिगृहाच्या पूर्वेस
नंदनवन कॉलनी, छावणी,औरंगाबाद – ४३१ ००२
✆ : (०२४०) २३७१०७७ / २३७१०६६
फॅक्स : (०२४०) २३७१०८८

(३) **मुंबई :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय केंद्र
द्वारा : जगन्नाश शंकरशेठ म.न.पा.ची मराठी शाळा,
दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ)
नाना चौक, ग्रँट रोड (प.), मुंबई – ४०० ००७
✆ : (०२२) २३८७४१८० / २३८७४१८३ / २३८७४१७७
फॅक्स : (०२२) २३८७४१८७

**(४) नागपूर** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र
रावबहादूर डी., लक्ष्मीनारायण बंगला
विद्यापीठ क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कँपस
रविनगर चौक, नागपूर – ४४० ००१
✆ : (०७१२) २५५३७२४ /२५
फॅक्स : (०७१२) २५५३७२५

**(५) नाशिक** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्र,
नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत, दुसरा मजला
नवीन पंडित कॉलनी
नाशिक –४२२ ००२
✆ : (०२५३) २३१७०६३
फॅक्स : (०२५३) २५७६७५६

**(६) पुणे** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय केंद्र
शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह, महापालिका शाळा
क्र.५ (मुलांची), ६५४, सदाशिव पेठ हौदासमोर
कुमठेकर मार्ग
पुणे –४११ ०३०
✆ : (०२०) २४४५७९१४
फॅक्स : (०२०) २४४९११०७

**(७) कोल्हापूर** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे कोल्हापूर विभागीय केंद्र
शिवाजी विद्यापीठ परिसर पोस्ट ऑफीसजवळ
विद्यानगर
कोल्हापूर – ४१६ ००४
✆ : (०२३१) २६०७०२२
फॅक्स : (०२३१) २६०७०२३

**(८) नांदेड** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ क्रीडा इमारत
नांदेड – ४२१ ६०६
✆ : (०२४६२) २२९९४० / २८३०३८
फॅक्स : (०२४६२) २२९९५०

## ९. विशेष सूचना / संपर्कासाठी

### (अ) प्रवेश–अर्ज भरण्यासंबंधीच्या सूचना

०१. प्रवेश–अर्ज भरण्यापूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली माहितीपुस्तिका वाचावी.

०२. प्रवेश–अर्जातील सर्व माहिती पूर्ण भरावी.

०३. मुदतीनंतर आलेल्या प्रवेश–अर्जांचा विचार केला जाणार नाही.

०४. विद्यापीठाकडून मिळालेले ओळखपत्र हरविल्यास रु. १५ आणि गुणपत्रक हरविल्यास रु. ५० (एकत्रित गुणपत्रक रु. १००/–) भरून दुसरी प्रत मिळेल. त्यासाठी शुल्काबरोबर आपले नाव, नोंदणी क्रमांक, वर्ग व अभ्यासकेंद्र ही माहिती कळविणे आवश्यक आहे. ही रक्कम डी.डी.ने पाठवावी. गुणपत्रकासाठी रु. ५०/– अथवा रु. १००/– च्या बॉण्ड पेपरवर प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करणे आवश्यक आहे.

### (आ) अभ्यासकेंद्रासंबंधीच्या सूचना

०१. प्रवेशाची मुदत संपल्यानंतर संपर्कसत्रे केव्हा सुरू करण्यात येतील, त्यासंबंधी अभ्यासकेंद्रावर जाऊन वेळापत्रक पाहावे. ओळखपत्रावर अभ्यासकेंद्र प्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का घ्यावा. अभ्यासकेंद्रात येताना व परीक्षेच्या वेळी ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

०२. विद्यापीठाने स्थापन केलेल्या अभ्यासकेंद्राव्यतिरिक्त अन्य कोणत्याही खाजगी संस्था किंवा शिकवणी वर्गांना (क्लास) विद्यापीठाची मान्यता नाही. अशा संस्थेत किंवा **'क्लास' मध्ये प्रवेश घेतल्यास किंवा जादा शुल्क भरल्यास विद्यापीठ जबाबदार असणार नाही.**

०३. अभ्यासकेंद्राशी सतत संपर्क ठेवणे आपल्या हिताचे आहे. पत्रव्यवहाराद्वारे आपणास माहिती न मिळाल्यास केंद्रावर माहिती मिळू शकेल.

०४. विद्यापीठाने केलेल्या नियोजनाप्रमाणे अंतिम परीक्षा अभ्यासकेंद्रावर घेण्यात येतात, त्यात बदल केला जात नाही.

०५. विद्यापीठाकडून गृहपाठ अभ्यासकेंद्रामार्फत दिले जातील. ते केवळ अभ्यासाच्या सरावासाठी आहेत. त्यांची उत्तरे लिहून पाहा. काही अडचणी असल्यास संबंधित अभ्यासक्रमाच्या मार्गदर्शक–अध्यापकांकडून मार्गदर्शन घ्यावे.

०६. अभ्यासकेंद्रावर पुरेशी विद्यार्थी नोंदणी झाली नसल्यास विद्यार्थ्यांना जवळच्या केंद्रावर संपर्कसत्र व परीक्षेस वर्ग (Transfer) करण्यात येईल.

०७. **प्रथम वर्षाला ज्या नावाने प्रवेश घेतलेला आहे, त्याच नावाने पदवी प्रमाणपत्र मिळेल. त्यात बदल होणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

### (इ) विद्यापीठाचे मुख्यालय

'ज्ञानगंगोत्री परिसर', गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक – ४२२ २२२.

दूरध्वनी क्र. (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७.

विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नाशिक येथील कार्यालयात यावयाचे असेल तर अशोकस्तंभ बसस्टॉपवर सकाळी ९.३० व सायंकाळी ५.०० वाजता बसेस उपलब्ध आहेत. अशोकस्तंभ मध्यवर्ती बस (जुने सी.बी.एस.) स्थानकापासून जवळ आहे.

**विद्यापीठ व विभागीय केंद्र यांच्या कार्यालयीन वेळा पुढीलप्रमाणे आहेत –**

- सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ (दुपारी १.३० ते २ सुटी)
- रविवार, प्रत्येक महिन्याचा पहिला व तिसरा शनिवार आणि शासकीय सुटीच्या दिवशी वरील कार्यालये बंद राहतील.

## ■ विशेष अडचणींबाबत संपर्क

१. **माहितीपुस्तिका, प्रवेश–अर्ज, अभ्यासकेंद्र अडचणी** :
विभागीय संचालक, विभागीय केंद्र

२. **अभ्यासक्रम (विषय) यांतील अडचणी** :
संचालक, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा
दूरध्वनी – (०२५३) २२३१४७५

३. **नोंदणी, नोंदणी क्रमांक, पत्ताबदल, केंद्रबदल** :
संबंधित विभागीय केंद्र

४. **परीक्षा, परीक्षा–अर्ज, परीक्षा क्रमांक, निकाल, पदवी प्रमाणपत्र, इत्यादी**
उपकुलसचिव, परीक्षा कक्ष, युनिट १
दूरध्वनी – (०२५३) २२३०७१६

५. **अध्ययन–साहित्य, पुस्तके, कार्यपुस्तिका, इत्यादी** :
भांडार व्यवस्थापक, भांडार व जावक कक्ष
दूरध्वनी – (०२५३) २२३०१०७

## विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।
ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १ ।।
नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।
हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

*कुसुमाग्रज*

## निर्मिती

श्री. आनंद यादव
व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

© २०१८, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

■ **प्रथम प्रकाशन** : मे २०१८
■ **प्रकाशक** : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

Badhan / AC18-95